I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): सातारा P.S. (पोलीस ठाणे): सातारा शहर Year (वर्ष): 2025

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0833 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 03/10/2025 20:49 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शुक्रवार Date from (दिनांक पासून): 19/09/2025 Date To (दिनांक पर्यंत): 19/09/2025

Time Period (कालावधी): प्रहर ५ Time From (वेळेपासून): 12:42 तास Time To (वेळेपर्यंत): 13:24 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 03/10/2025 Time (वेळ): 20:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 057 Date and Time (दिनांक आणि वेळ): 03/10/2025 20:49 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पूर्व, 1 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): वस्तु व सेवा कर कार्यालय, सातारा ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

(b) **Husband's Name (चे नाव ):** सुभाष गावडे

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्षय फडतरे | | | 1. Town/Village (शहर / गाव): सातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | रोहन देवकर | | | 1. राज्य कर निरीक्षक,Town/Village (शहर / गाव): सातारा,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सातारा शहर,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.**

**First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 03/10/2025

मी सुप्रिया सुभाष गावडे वय 34 वर्षे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा मो.नं.7758082005.

समक्ष सातारा शहर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की, मी दिनांक 19/09/2025 रोजी ॲन्टी करप्शन ब्यूरो, सातारा कार्यालयात हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक राजेश वाघमारे यांनी 10.00 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेऊन समक्ष हजर असले तक्रारदार अक्षय सुरेश निकम वय- 33 वर्षे व्यवसाय- सिद्धनाथ ट्रेडर्स रा. मु.पो. कोंजवडे, ता.पाटण, जि.सातारा यांची ओळख करून देवून, तक्रारदार यांचे वस्तू व सेवा कर (जीएसटी) कार्यालय, सातारा या कार्यालयातील विक्रीकर निरीक्षक फडतरे व देवकर हे सन 2022- 2023 मधील जीएसटी टॅक्स मधील टू बी - थ्री बी मधील फरक पडल्याने त्याचे पडलेले दंड व दंडावरील व्याज माफ करून देण्यासाठी 25,000/- रुपये लाच मागणी करीत असलेबाबतची तक्रार सांगीतली व तक्रारदार यांचे तक्रारीवर पुढील कारवाई करणेबाबतचा आदेश दिला.

त्यावेळी मी लागलीच कार्यकारी अभियंता, उरमोडी धरण, विभाग सातारा यांचे कार्यालयातून लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलाविले असता 1) दिनेश नामेदव कोहाळे, सहा. अभियंता श्रेणी 2, उरमोडी धरण विभाग 2) अमर चंद्रहार पवार, सहा.अभियंता श्रेणी 2, उरमोडी धरण विभाग हे दोन शासकीय पंच म्हणुन हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार निकम यांना शासकीय पंच, सापळा पथकातील पोहवा राजपुरे, ताटे, चव्हाण, पोशि देशमुख यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी मी तक्रारदार यांना पंच व सापळा पथकासमक्ष त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी सांगीतले की, मी वरील ठिकाणचा कायमचा रहिवशी असून  माझे शिक्षण बीए पर्यंत झालेले आहे. मला इंग्रजी, हिंदी, मराठी भाषेचे ज्ञान आहे. मी सन 2021 पासून सिद्धनाथ ट्रेडर्स, मु.पो.कोंजवडे ता.पाटण जि.सातारा या नावाची फर्म चालवत असून त्याचे अंतर्गत सातारा जिल्हयातील कारखान्यामधून साखर खरेदी करून ती घाऊक बाजारामध्ये विक्रीचा व्यवसाय करत आहे. सिद्धनाथ ट्रेडर्स या फर्मचा जीएसटी नंबर काढलेला असून तो नंबर 27BAYPN2141N1Z0 असा आहे. त्याचा जीएसटी मी वेळोवेळी भरलेला आहे.

सिद्धनाथ ट्रेडर्सच्या जीएसटीच्या कामानिमीत्ताने मी जीएसटी कार्यालय, सातारा येथे वारंवार जात असतो. त्यामुळे त्या कार्यालयातील श्री अक्षय फडतरे, विक्रीकर निरीक्षक हे माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. दिनांक 18/09/2025 रोजी श्री अक्षय फडतरे, जीएसटी यांचा त्यांचे मोबाईल  नबर 8412979056  वरून माझे मोबाईल नंबर 9860899997 वर व्हॉटसअप कॉल आला होता. त्यावेळी त्यांनी तुमच्या सिद्धनाथ ट्रेडसचा सन 2022-2023 चा एकूण जीएसटी 3,25,131.30/- रु झाला असून त्यापैकी 3,14,120.50/- रु जीएसटी टॅक्स भरलेला आहे. सन 2022-2023 सालचा 11,010.80/- रु इतका जीएसटी टॅक्स बाकी असून त्याचा तुम्हाला 50,000/- रु दंड बसणार आहे. माझी आता त्या टेबलवरून बदली झाली असून तुमचे काम हे रोहन देवकर साहेब हे पाहत आहेत. तुमच्या जीएसटी चा दंड वाचवायचा असल्यास देवकर साहेब यांना 25,000/- रु दयावे लागतील तर ते तुमचा जीएसटी दंड कमी करून देतील असे सांगितले.

त्यांनतर दिनांक 18/09/2025 रोजी जीएसीटी कार्यालयातील रोहन देवकर, विक्रीकर निरीक्षक यांनी

त्यांचा मोबाईल क्रमांक 7757093240 वरून 04.22 वाचे सुमारास माझे मोबाईलवर संपर्क करून माझ्या जीएसटी दंडाच्या कामाच्या संदर्भाने चर्चा केली व त्यांनी मला जीएसटी कार्यालय, सातारा येथे समक्ष भेटण्यास बोलविले आहे.

अक्षय फडतरे यांनी रोहन देवकर यांना देणेस सांगितलेले 25,000/- रु ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतू त्यांना लाच रक्कम देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

मी आज दिनांक 19/09/2025 रोजी मी जीएसटी कार्यालय, सातारा येथील श्री अक्षय फडतरे, विक्रीकर निरीक्षक व श्री रोहन देवकर, विक्रीकर निरीक्षक यांची जीएसटी कार्यालय, सातारा येथे जावून भेट घेणार असून माझ्या जीएसटी दंडाच्या कामासंदर्भाने चर्चा करणार आहे. तसेच त्यांचेशी त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत चर्चा करणार आहे. मला त्यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने आपले विभागामार्फत त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती.

माझेत व जीएसटी कार्यालयातील फडतरे साहेब व देवकर साहेब यांचेत कोणतेही पुर्वीचे आर्थिक व्यवहार अथवा पुर्ववैमनस्य नाही. असे म्हणुन तकार सांगुन तकारी अर्ज दिला.

त्यानंतर तक्रारदार निकम यांनी त्याचे हस्ताक्षरातील त्यांचे स्वाक्षरीचा लेखी तक्रार अर्ज सहपत्रासह हजर केला. मी तो तक्रारी अर्ज वाचुन पाहिला व पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी त्याचे हस्ताक्षरातील हजर केलेल्या लेखी तक्रारी अर्जावर मी व पंचांनी सहया केल्या.

तकारीच्या अनुषंगाने तक्रारदार अक्षय निकम यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे तक्रारदार यांचे वस्तू व सेवा कर (जीएसटी) कार्यालय, सातारा या कार्यालयातील विक्रीकर निरीक्षक फडतरे व देवकर हे सन 2022- 2023 मधील जीएसटी टॅक्स मधील टूबी- थ्री बी मधील फरक पडल्याने त्याचे पडलेले दंड व दंडावरील व्याज माफ करून देण्यासाठी 25,000/- रुपये लाच मागणी करीत असलेबाबत लोकसेवक विक्रीकर निरीक्षक फडतरे व देवकर हे लाच मागणी करीत आहेत अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून त्याकामी पंच नंबर 1 म्हणून दिनेश नामदेव कोहाळे व पंच नंबर 2 म्हणुन अमर चंद्रहार पवार हे काम करतील असे पंचाचे व तकारदार यांचे सहमती ठरविले व पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी तक्रारदार व पंच नं.1 कोहाळे यांना सूचना दिल्या.

त्यानंतर दिनांक 19/09/2025 रोजीचे पडताळणीवेळी तक्रारदार निकम व लोकसेवक विक्रीकर निरीक्षक फडतरे व देवकर,जीएसटी कार्यालय सातारा यांचेत होणारे लाच मागणी संबंधाने संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व MMCARDS कंपनीचे 8 GB कार्ड त्याचे वरील बाजुस MMCARDS micro SD HC 8GB EZASHY0725BR व खालील बाजुस 09072025YLY EZASHY0725BR MADE IN TAIWAN असे लिहीलेले एक नवीन मेमरीकार्ड दाखविले. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसा चालू-बंद केला जातो त्याचे प्रात्यक्षिकही करून दाखविले व त्यामध्ये नमूद वर्णणाचे नवीन मेमरी कार्ड घालून ते फॉरमॅट केल्यानंतर त्या मेमरी कार्ड मध्ये व रेकॉर्डरमध्ये कोणतेही संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानुसार 12.42 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार व पंचांचे निवेदन ध्वनीमुद्रीत केले. तो व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील बनियान मध्ये लावून दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे पडताळणी कारवाईसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयातुन तक्रारदार यांचे चारचाकी वाहन टोयोटो इटीयॉस क्रमांक एम एच 10 बी.ए. 2865 मधुन जी.एस.टी.कार्यालय सातारा येथे जाणेकरीता रवाना झाले.

काही वेळानंतर तक्रारदार व पंच 1 हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात परत आले तेव्हा मी तक्रारदार निकम यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद केला ती वेळ 13.24 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 दिनेश नामदेव कोहाळे यांनी सांगितले की, तक्रारदार व मी, तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन जीएसटी कार्यालय सातारा समोर गेलो तेथे एका इसमास पाहुन तक्रारदार यांनी "काय चाललय" असे विचारले त्यावेळी सदर इसमाने तक्रारदार निकम यांना "या की" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार आताच विचारल खाली, वरती आलाय का ? असे म्हणाले तेव्हा सदर व्यक्तीने एका चौकानी कक्षाकडे बोट दाखवुन "हो हाय वरती, सांगितलय त्यांना" असे सांगीतले तेव्हा मला ते फडतरे साहेब असल्याचे समजले. त्यानंतर मी व तक्रारदार सदर कक्षामध्ये गेलो तेव्हा तेथे खुर्चीत बसलेल्या एका इसमास तक्रारदार निकम यांनी "रोहन देवकर साहेब का ?" असे विचारले तेव्हा तेथे बसलेल्या इसमाने "हो" म्हणुन सांगितले. त्यावेळी मला ते देवकर साहेब असल्याचे समजले. त्यावेळी तक्रारदार निकम व मी तेथील खुर्चीवर बसलो. त्यावेळी देवकर साहेब यांनी तक्रारदार निकम यांस "तुमच्या मित्राने सांगितले" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार त्यांस "हा..." असे म्हणाले. त्यानंतर देवकर साहेब यांनी तक्रारदार निकम यांना "नुसता 34000 हजार रुपये फाईन लागलाय" असे सांगुन त्यांना " आणि बावीस तेवीस चा अकरा हजार रुपये .. दोन्ही मिळुन 60 हजार रुपये पर्यंत जाईल " असे सांगितले. त्यावर तक्रारदार निकम हे त्यांना " हा..हा.. काय झालय, झालेली परिस्थिती पण बघताय तुम्ही आता काय?" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत इतर चर्चा चालु असताना तेथे फडतरे साहेब हे कक्षात आले व आमचे शेजारी असलेल्या कक्षात खुर्चीवर बसले. त्यानंतर तक्रारदार निकम यांनी देवकर साहेब यांना " किती सालच हाय "म्हणाला?" असे विचारले. त्यावर देवकर साहेब यांनी त्यांना "एकविस -बावीस" असे सांगितले. त्यानंतर देवकर साहेब यांनी तक्रारदार निकम यांना "काय होतय 50 ते 60 च्या आसपास जातय" असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "लय वाटतय, काय परिस्थिती पण नाय तेवढ भरायची .. होय.." असे विचारले. त्यावर देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना "आमच्या ह्यान बघा.. आम्हाला नोकरी करायचीय बाकी नाय काय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम त्यांना "आमच्या ह्यान काय बघा....कमी होईल का त्यात काय" असे म्हणाले. त्यावर पुन्हा देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना "पन्नास हजार रुपये हायत ते राहुदया भरायचे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम यांनी फडतरे साहेब यांचेकडे बघुन "अक्षय सर काय करायच" असे म्हणाले. त्यावर फडतरे साहेब हे तक्रारदार निकम यांना "त्यांच्याशी बोला की" असे म्हणाले. त्यावर देवकर साहेब हे फडतरे साहेब यांना " त्यांना सांगितलय की आता काय.." असे म्हणाले त्यावर फडतरे साहेब तक्रारदार निकम यांना " त्यांच्याकडेच केस हाय म्हनंटल्यावर " असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार निकम, फडतरे साहेब व देवकर साहेब यांचेत इतर विषयांसंबंधी चर्चा झाली.त्यानंतर तक्रारदार निकम यांनी देवकर साहेब यांना "काय करायच सर सांगा" असे विचारले असता त्यांनी तक्रारदार यांना "तुमच्या ह्यान सांग " असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "आमच्या ह्यान आता काय सांगायच व्हय... गरीबाच्या मागे काय लावु नका म्हणजे झाल" असे म्हणाले. त्यानंतर देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना फडतरे साहेब यांचेकडे बोट दाखवुन "तुम्हाला त्यांनी सांगितल होत तेवढ्यासाठी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "सांगा तरी काय..." असे

म्हणाले. त्यावर देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना "तुमची चर्चा किती होती..." असे म्हणुन देवकर साहेब यांनी त्यांचेजवळील कॅल्कुलेटरवर 30000 टाईप करुन आमचेसमक्ष तक्रारदार निकम यांना दाखविले. त्यावर तक्रारदार निकम हे त्यांना "जास्त होत्यात 30 हजार "म्हणजे.." असे म्हणाले. त्यानंतर देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना " तुमच्या हयानं बघा आता " असे म्हणाले व थोडा वेळ थांबुन तक्रारदार यांस " 25 हजार." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम यांनी त्यांना "अँ " असे म्हणाले असता देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना "25 हजार" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "नको पंचवीस, नाय ऐवढी धंद्याची परिस्थिती, नाय 'तेवढी," असे म्हणाले व फडतरे साहेब यांचेकडे पाहुन "होय अक्षय सर बोला त्यांना "असे म्हणाले . त्यावर फडतरे साहेब हे तक्रारदार निकम यांना "आता काय बोलनार नाय असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे फडतरे साहेब यांना "लय सांगत्यात, आता काय...? " असे म्हणुन लोकसेवक देवकर यांना "दहा, दहा हजार घ्या की, होय दहा हजार रुपये, दहा हजार रुपये करुन द्या, परत त्रास होणार नाही ना काय," असे म्हणाले. तेव्हा देवकर साहेब अहो, नाय नाय असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांचेसोबत कामाबाबत चर्चा करु लागले. त्यानंतर देवकर साहेब यांनी माझेकडे पाहुन तक्रारदार निकम

हे फडतरे साहेब यांना "लय सांगत्यात, आता काय...? " असे म्हणुन लोकसेवक देवकर यांना "दहा, दहा हजार घ्या की, होय दहा हजार रुपये, दहा हजार रुपये करुन द्या, परत त्रास होणार नाही ना काय," असे म्हणाले. तेव्हा देवकर साहेब अहो, नाय नाय असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांचेसोबत कामाबाबत चर्चा करु लागले. त्यानंतर देवकर साहेब यांनी माझेकडे पाहुन तक्रारदार निकम यांना माझेबाबत चौकशी केली. त्यानंतर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना " पंधरा वर करा," असे म्हणाले त्यावर देवकर साहेब त्यांना " नाही होत "असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "अं... सांगा तुम्ही एकदा, पंधरा हजारावर करुन टाका, व्हय ओ साहेब "असे म्हणुन पैसे कमी करणेबाबत सांगु लागले. त्यावर देवकर साहेब तक्रारदार निकम यांना "'वीस आणा 'वीस असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे "अं "असे म्हणाले त्यावर देवकर साहेब हे तक्रारदार निकम यांना "'वीस हजार "असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम यांनी देवकर साहेब यांना "हाय ना तुम्ही इथं? किती वाजेपर्यंत,हाय"असे विचारले असता देवकर साहेब यांनी तक्रारदार निकम यांना "तीन वाजेपर्यंत "'असे सांगितले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "फोन करतो तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर देवकर साहेब हे त्यांना "चालतय"असे म्हणाले. त्यावर तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "'वीस हजार रुपये करतो, पण परत हि झाल नाही पाहिजे, डोक्याला परत लागल नाय पाहिजे ना" असे म्हणाले. त्यावेळी फडतरे साहेब हे आमचे सोबत देवकर साहेब यांचे कंर्पाटमेंट हजर होते. त्यावर देवकर साहेब हे त्यांना "हे बघा आम्ही 21-22 चे काढुन टाकतोय " असे म्हणाले. त्यानंतर देवकर साहेब यांनी माझेकडे माझेबाबत विचारपुस करु लागले. त्यावेळी तक्रारदार निकम हे देवकर साहेब यांना "बर, फोन करतो मग, चला येतो "मंग" असे म्हणुन आम्ही देवकर साहेब यांचे कक्षातुन बाहेर आलो तेव्हा फडतरे साहेब हे पण आमचे सोबत देवकर साहेबांच्या कक्षातुन बाहेर आहे. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन कार्यालयाचे बाहेर आलो. त्यानंतर तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन आम्ही एसटी स्टॅन्ड मागेर्, पोवईनाका कडुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येत असताना तक्रारदार यांना त्याचे फोनवर 8412979056 या

क्रमांकावरुन फडतरे साहेब यांचा फोन आला व ते तक्रारदार यांना ते कोठे आहेत, त्यांना तक्रारदार यांना भेटायचे आहे असे सांगुन तक्रारदार यांचेशी फोनवरुन चर्चा करु लागले असता तक्रारदार यांनी त्यांना मी दवाखान्यात चाललो असुन मी अर्धा तासाने माघारी येतो असे सांगितले असता फडतरे साहेब यांनी फोन कट केला. त्यानंतर मी व तक्रारदार चारचाकी वाहनातुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय सातारा येथे परत आलो. वैगेरे मजकूरची हकिगत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. सदरवेळी मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले ते पंच नंबर 1 व तक्रारदार यांचे हकीकतीशी मिळतेजुळते आहे.

एकंदरीत दिनांक 19/09/2025 रोजीचे पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार व पंच नंबर 1 जीएसटी कार्यालय सातारा येथे गेल्यानंतर तक्रारदार यांची लोकसेवक फडतरे यांची भेट झाली तेव्हा त्यांनी लोकसेवक देवकर यांना कामाबाबत सांगीतले असल्याचे सांगीतले. तसेच पडताळणी कारवाई वेळी लोकसेवक देवकर यांनी तक्रारदार यांचा सन 2021-2022 व 2022-2023 मधील बाकी भरण्याचा राहीलेला जीएसटी व त्यावरील दंड व दंडावरील व्याज माफ करून देण्यासाठी लोकसेवक देवकर यांनी लोकसेवक फडतरे, राज्यकर निरीक्षक व पंच नंबर 1 यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची व लाच रक्कम तीन वाजेपर्यत आणून देण्यास सांगितल्याची पंचांची व माझी खात्री झालेने सापळा कारवाईचे नियोजन करण्याचे ठरविले.

त्यानंतर मी तक्रारदार अक्षय निकम यांना लोकसेवक देवकर यांना देण्यासाठी लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांचे कडील 20,000/- रूपये हजर केले. सदर रक्कम कोठून आणली याबाबत तक्रारदार निकम यांना विचारणा केली असता सदर रक्कम ही तक्रारदार यांचे व्यवसायातील शिलकीतील असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. त्यामध्ये 500/- रुपये दराच्या भारतीय चलनाच्या 40 नोटा आहेत. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार यांनी 20,000/- रुपये लाच रकमेच्या नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहुन त्यावर मी व पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर मी पंचास व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरची डबी व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन, अँथ्रासिन पावडर ज्या वस्तुस अगर हातास लागलेली असते ती वस्तु अगर हात लाईटचे प्रकाशात पाहिल्यास अँथ्रासिन पावडर लागल्याचे दिसत नाही. परंतु अंधार करुन अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिलेस फिक्कट निळसर चकाकी दिसुन येते असे त्याचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगुन तक्रारदार यांनी हजर केलेली 20,000/- रुपये लाच रक्कम पोकॉ देशमुख यांच्याकडे देवून, तक्रारदार यांनी हजर केलेली 20,000/- रुपये लाच रक्कमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे पो कॉ देशमुख यांनी कक्षातील टेबलवर सफेद कागदावर नोटा ठेवून त्यास अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने नोटांचे दोन्ही बाजुस लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोकॉ देशमुख यांनी 20,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशामध्ये अलगद ठेवली. त्यानंतर पो.कॉ.देशमुख यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार अक्षय निकम व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने सुचना दिल्या. तसेच लाच रक्कम लोकसेवक देवकर यांनी स्विकारलेनंतर तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात दोन वेळा डोक्याचे केसावर फिरवुन इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी

सापळा कारवाईवेळी तक्रारदार अक्षय निकम व लोकसेवक देवकर यांचेत होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळी असलेले मेमरीकार्ड असुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळच्या 1 फाईल्स सेव्ह असुन तेच मेमरीकार्ड पुढे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगुन तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंचांचे, व तक्रारदार यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत करण्यात आले. ती वेळ 15.04 वा.चे सुमाराची होती.

त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 हे जीएसटी ऑफिस पोवईनाका सातारा येथे लोकसेवक देवकर यांना भेटणेसाठी तक्रारदार यांचे चारचाकी वाहनामधून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा या कार्यालयातुन रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा पथकातील अंमलदारांचे दुचाकी वाहनांवरुन जीएसटी ऑफिस पोवईनाका सातारा समोर वाहन उभे करून कोणास संशय येणार नाही अशा रितीने आडोशास सापळा लावुन थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार अक्षय निकम व पंच नं. 1 कोहाळे असे जीएसटी कार्यालयाचे बाहेर आले व ठरलेला इशारा न करता तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयाचे दिशेने जावु लागले. त्यामुळे मी व पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आले. तेव्हा मी तक्रारदार निकम यांचे शर्टचे आतील बाजुस बनियानमध्ये लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 15.35 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 दिनेश नामदेव कोहाळे यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे फडतरे व लोकसेवक देवकर यांची जी.एस.टी. कार्यालयात भेट घेणेसाठी गेलो असता कार्यालयाचे खाली पोहचलेवर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाइल वरुन लोकसेवक देवकर यांचा मोबाइल क्रमांक 7757093240 यावरती लाउडस्पिकर ऑन करुन फोन लावला. त्यावेळी लोकसेवक देवकर यांनी तक्रारदार यांना ते आता घरी आलो आहे माझी तब्बेत ठिक नाही असे सांगुन डीआरसी 03 वर पेमेंट करा पावती पाठवुन द्या असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार असे कार्यालयातुन बाहेर आलो व तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय सातारा येथे परत आलो. वैगेरे मजकूरची हकिगत सांगितली.

दिनांक 19/09/2025 रोजीचे सापळा कारवाईमध्ये तक्रारदार अक्षय निकम हे जीएसटी ऑफिस पोवईनाका कार्यालयामध्ये गेले त्यावेळी लोकसेवक देवकर यांची भेट झाली नाही. परंतु लोकसेवक देवकर यांना तक्रारदार यांनी फोन केलेवर त्यांनी मी आता घरी आलो आहे माझी तब्बेत ठिक नाही असे सांगुन  डीआरसी 03 वर पेमेंट करा पावती पाठवुन द्या असे सांगितलेने मी व दोन्ही पंचांची आज रोजी देवकर साहेब यांची भेट होणार नसल्याची खात्री झाल्याने सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. तसेच दिनांक 22/09/2025 रोजी जीएसटी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी पुन्हा सापळा कारवाई करण्यात येईल असे माझे, तक्रारदार व पंचांचे सहमतीने ठरविण्यात आले. दिनांक 19/09/2025 रोजी सापळा कारवाई वेळी वापरण्यात आलेल्या नोटा दिनांक 22/09/2025 रोजी सापळा कारवाई वेळी वापरण्यात येतील असे सांगुन मी सिलबंद लखोट्यात स्वत:च्या ताब्यात ठेवल्या. त्यानंतर पडताळणी व सापळा पंचनामाबाबतचे स्क्रीप्ट व पंचनामा तयार करुन त्यावर मी व पंचानी सह्या केल्या. सर्व कार्यवाही ला.प्र.वि.कार्यालय सातारा येथे पूर्ण करण्यात आली आहे.

त्यानंतर दिनांक 22/09/2025 रोजी दिले मी दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात माझे केबीनमध्ये गोपनिय कामकाजासाठी 14.00 वा. हजर झाले. तेव्हा मी दिनांक 19/09/2025 रोजी करण्यात आलेल्या कारवाईची व देण्यात आलेल्या सुचनांची उजळणी करुन घेतली. त्यानंतर मी पंचास व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरची डबी व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन, अँथ्रासिन पावडर ज्या वस्तुस अगर हातास लागलेली असते ती वस्तु अगर हात लाईटचे प्रकाशात पाहिल्यास अँथ्रासिन पावडर लागल्याचे दिसत नाही. परंतु अंधार करुन अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिलेस फिक्कट निळसर चकाकी दिसुन येते असे त्याचे गुणधर्म व उपयोग समजावून सांगुन दिनांक 19/09/2025 रोजीचे सापळा कारवाईवेळी सिलबंद लखोट्यातील लाच रक्कम पो.कॉ.देशमुख यांनी बाहेर काढुन सदर 20,000/- रुपये लाच रक्कमेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे पो कॉ देशमुख यांनी कक्षातील टेबलवर सफेद कागदावर नोटा ठेवून त्यास अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने नोटांचे दोन्ही बाजुस लावली. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोकॉ देशमुख यांनी 20,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशामध्ये अलगद ठेवली. त्यानंतर पो.कॉ.देशमुख यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले.

त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार अक्षय निकम व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईवेळी तक्रारदार अक्षय निकम व लोकसेवक देवकर यांचेत होणारे संभाषण ध्वनिमुद्रीत करण्यासाठी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळी असलेले मेमरीकार्ड असुन त्यामध्ये पडताळणी कारवाईवेळच्या 1 फाईल्स सेव्ह असुन तेच मेमरीकार्ड पुढे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगुन तक्रारदार व पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पंचांचे, व तक्रारदार यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत करण्यात आले. ती वेळ 16.06 वा.चे सुमाराची होती.
त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 1 हे जीएसटी ऑफिस पोवईनाका सातारा येथे देवकर साहेब यांना भेटणेसाठी तक्रारदार यांचे चारचाकी वाहनामधून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा या कार्यालयातुन रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा पथकातील अंमलदारांचे दुचाकी वाहनांवरुन जीएसटी ऑफिस पोवईनाका सातारा समोर वाहन उभे करून कोणास संशय येणार नाही अशा रितीने आडोशास सापळा लावुन थांबुन राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार अक्षय निकम व पंच नं. 1 कोहाळे असे जीएसटी कार्यालयाचे बाहेर आले व तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन पुन्हा ला.प्र.वि. सातारा कार्यालयाचे दिशेने जावु लागले त्यामुळे मी व पंच नंबर 2 व सापळा पथक त्यांचे मागोमाग ला.प्र.वि.सातारा कार्यालयात परत आले. तेव्हा मी तक्रारदार निकम यांचे शर्टचे आतील बाजुस बनियानमध्ये लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 16.29 वा. चे सुमाराची होती. त्यानंतर मी पंच नंबर 1 यांचेकडे समक्ष काय घडले याबाबत विचारणा केली असता, पंच नंबर 1 दिनेश नामदेव कोहाळे यांनी सांगितले की, मी तक्रारदार यांचे सोबत जी.एस.टी.कार्यालय पोवई नाका सातारा येथे गेलो असता तक्रारदार यांची व देवकर राज्यकर निरीक्षक यांची भेट झाली नाही. तसेच तक्रारदार यांनी लोकसेवक देवकर यांना फोन केला असता त्यांनी फोन उचचला नाही.

त्यानंतर मी तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे

हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. सदरवेळी मी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले ते पंच नंबर 1 व तक्रारदार यांचे हकीकतीशी मिळतेजुळते आहे. त्यामुळे दिनांक 22/09/2025 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात आली. त्यानंतर पडताळणी व सापळा कारवाई वेळी वापरलेले मेमरीकार्ड मधील फाईलची स्क्रिप्ट तयार करुन त्याची हॅश व्हॅल्यु काढुन ते मेमरीकार्ड जप्त केले वगैरे मजकुराचा सापळा पंचनामा पुर्ण केला त्यावर मी व पंचांनी सहया केल्या.

दिनांक 26/09/2025 रोजी तक्रारदार अक्षय निकम यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात समक्ष उपस्थित राहुन जबाब दिला असुन त्यामध्ये राज्यकर निरीक्षक रोहन फडतरे हे सुट्टीवर गेले असुन त्यांचा फोन उचलत नसल्याचे सांगीतले, तसेच पुन्हा लाच रक्कम घेवुन येणेबाबत निरोप दिलेला नाही. तक्रारदार यांना देय असलेली जी.एस.टी रक्कम त्यांचे अकाउंटला शिल्लक असल्याचे सांगीतले. त्यामुळे राज्यकर निरीक्षक रोहन देवकर हे लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नाही असे तक्रारदार सांगत असल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. तरी दिनांक 19/09/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वेळी घडलेल्या घटना व झालेले ध्वनिमुद्रीत संभाषण यावरुन यातील मुळ तक्रारदार अक्षय सुरेश निकम वय- 33 वर्षे व्यवसाय- सिद्धनाथ ट्रेडर्स रा.मु.पो.कोंजवडे ता.पाटण जि.सातारा हे जीएसटी कार्यालय सातारा येथे गेल्यानंतर तक्रारदार यांची अक्षय फडतरे, राज्य कर निरीक्षक यांची भेट झाली तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना रोहन देवकर, राज्य कर निरीक्षक यांना कामाबाबत सांगीतले असल्याचे सांगीतले. तसेच पडताळणी कारवाई वेळी रोहन देवकर राज्य कर निरीक्षक यांनी तक्रारदार यांचा 2022-2023 मधील बाकी भरण्याचा राहीलेला जीएसटी व त्यावरील दंड व दंडावरील व्याज माफ करून देण्यासाठी अक्षय फडतरे, राज्यकर निरीक्षक व पंच नंबर 1 दिनेश कोहाळे यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची व लाच रक्कम तीन वाजेपर्यत आणून देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे म्हणुन लोकसेवक रोहन देवकर, राज्य कर निरीक्षक यांनी तक्रारदार अक्षय निकम यांचेकडुन लोकसेवा प्रदान करण्याकरीता अयोग्यरित्या बेकायदेशीर परितोषण स्विकारण्याच्या प्रयत्न केला असल्याने तसेच लोकसेवक अक्षय फडतरे, राज्य कर निरीक्षक यांनी सदरच्या बेकायदेशीर परितोषणास अपप्रेरणा दिल्याने त्यांचेविरुद्ध माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12, प्रमाणे फिर्याद आहे.

समक्ष हा जबाब दिला.

(सुप्रिया सुभाष गावडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सातारा.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rajendra Bapu Maske (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Rajendra Bapu Maske

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**